नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०१/०७/२०२६ (बुधवार )

---

# मा.श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण यांची राष्ट्रीय रस्ता सुरक्षा मंडळावर तज्ज्ञ सदस्य म्हणून नियुक्ती

भारत सरकारच्या रस्ता परिवहन व महामार्ग मंत्रालयाने मोटार वाहन अधिनियम, १९८८ मधील कलम २१५(बी) अंतर्गत स्थापन केलेल्या राष्ट्रीय रस्ता सुरक्षा मंडळ (National Road Safety Board - NRSB) वर मा. श्री हर्ष ए. पोद्दर, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण यांची तज्ज्ञ सदस्य (Expert Member) म्हणून नियुक्ती केली आहे. ही नियुक्ती नागपूर ग्रामीण पोलीस दलासाठी अभिमानास्पद असून, रस्ता सुरक्षा क्षेत्रातील त्यांच्या अनुभवाची व कार्याची राष्ट्रीय स्तरावर दखल घेतल्याचे प्रतीक आहे.

राष्ट्रीय रस्ता सुरक्षा मंडळ हे देशातील रस्ता सुरक्षा अधिक सक्षम, सुरक्षित व तंत्रज्ञानाधिष्ठित करण्यासाठी केंद्र सरकारला मार्गदर्शन करणारे महत्त्वाचे वैधानिक मंडळ आहे. रस्ता सुरक्षा, वाहतूक व्यवस्थापन आणि विशेषत: डोंगराळ भागातील रस्त्यांसाठी आवश्यक मानके व मार्गदर्शक तत्त्वे तयार करणे, वाहतूक पोलीस, रुग्णालये, महामार्ग प्राधिकरणे तसेच शैक्षणिक व संशोधन संस्थांची क्षमता वाढीसाठी धोरणे तयार करणे, ट्रॉमा केअर व पॅरामेडिकल सुविधांसाठी मार्गदर्शक तत्त्वे विकसित करणे ही मंडळाची प्रमुख कार्ये आहेत.

याशिवाय केंद्र व राज्य सरकारे तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांना रस्ता सुरक्षा व वाहतूक व्यवस्थापनाबाबत तांत्रिक सल्ला देणे. आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सर्वोत्तम कार्यपद्धतींचा प्रसार करणे तसेच **Good Samaritans** अपघातग्रस्तांना मदत करणारे नागरिक या संकल्पनेला प्रोत्साहन देणे, रस्ता सुरक्षेतील सर्वोत्तम कार्यपद्धतींचा प्रसार करणे, वाहन अभियांत्रिकी क्षेत्रातील नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार करण्यास प्रोत्साहन देणे, आंतरराष्ट्रीय

**संस्थांशी समन्वय साधणे, आंतरराष्ट्रीय व देशांतर्गत तांत्रिक मानकांमध्ये सुसंगती राखणे तसेच रस्ता सुरक्षा, वाहतूक व्यवस्थापन आणि अपघात तपासणीमध्ये सुधारणा करण्यासाठी संशोधन करणे ही देखील मंडळाची महत्त्वाची जबाबदारी आहे.**

**मा. श्री. हर्ष ए. पोद्दर, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या या महत्त्वपूर्ण नियुक्तीबद्दल नागपूर ग्रामीण पोलीस दलातर्फे त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.**

## मा. वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी पोलीस अधिकारी आणि अंमलदार यांच्यासाठी घेतली " सर्व कर्मचारी संवाद बैठक" (All Hands Meet)

आज दिनांक ०१/०७/२०२६ रोजी पोलीस भवन, नागपुर येथे मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी पोलीस अधीक्षक कार्यालय, तसेच पोलीस मुख्यालय, नागपुर ग्रामीण जिल्हा येथील पोलीस अधिकारी, अंमलदार आणि मंत्रालयीन स्टाफ यांची **" सर्व कर्मचारी संवाद बैठक " (All Hands Meet) घेतली** . उपस्थित पोलीस अधिकारी/अंमलदार यांच्या अडीअडचणी, कामकाजासंदर्भातील विविध मुद्दे तसेच नवनविन कल्पना या विषयांवर चर्चा करण्यात आली. **सदर वेळी उपस्थित अधिकारी यांनी बैठकीदरम्यान गुन्हे तपासामध्ये महत्त्वपूर्ण ठरणारे रक्त नमुने व इतर जैविक पुरावे योग्य पद्धतीने जतन करता यावेत यासाठी डीप फ्रीजरची सुविधा उपलब्ध करून देण्याची आवश्यकता असल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आल्याने जैविक पुराव्यांच्या (Biological Evidence) शास्त्रोक्त संकलन जतनासाठी उपविभाग स्तरावर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच सेवानिवृत्त होणाऱ्या पोलीस अधिकारी व अंमलदारांचे सेवापुस्तक निवृत्तीच्या किमान सहा महिने पूर्वी पडताळून आवश्यक त्रुटींची पूर्तता करण्याचे निर्देश मा. वरिष्ठ पोलीस अधीक्षक यांनी दिले.**

सदर बैठकीत पोलीस दलातील विविध पदावरील अधिकारी/अंमलदार यांच्या अनुभवाचा उपयोग करून पोलीस दलातील कामकाजात येणाऱ्या अडचणींवर उपाय शोधणे, पोलीस दलाची कार्यक्षमता वाढविणे, शिस्त व समन्वय राखणे याबाबत चर्चा करण्यात आली. **सदर**

**सर्व कर्मचारी संवाद बैठकीस श्रीमती पुजा गायकवाड,पोलीस उपअधिक्षक (गृह),तसेच सर्व शाखेचे प्रभारी अधिकारी, अंमलदार आणि पोलीस मुख्यालय येथील अधिकारी आणि अंमलदार उपस्थित होते.**

## दारूच्या नशेत भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने वाहन चालवुन मृत्युस कारणीभुत आरोपी विरूध्द सदोष मनुष्यवधचा गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन उमरेड :–** दिनांक ३०/०६/२०२६ रोजी उमरेड पोलीस स्टेशन येथे फिर्यादी मनोज दयाराम बोदरे, वय ४४ वर्ष, रा. शिवनगर प्लॉट क्र ३६, घुमळे ले आउट उमरेड यांनी फिर्याद दिली की, दिनांक ३०/०६/२०२६ फिर्यादीचे वडील हे घरुन सायंकाळी ०६/१५ वाजता दरम्यान पायदळ आईची औषध संपल्याने घेणे करिता ज्योती मेडीकल, भिसी नाका उमरेड येथे गेले असता भारतीय भोजनालय, उमरेड चे समोर पल्सर मोटर सायकल क्र एम एच ४०/सी एस २३२९ चा चालक आरोपी आकाश सुभाष यादव, वय २५ वर्ष, रा. डब्लुसिएल उमरेड याने त्याचे ताब्यातील वाहन दारुच्या नशेत वेगाने चालवुन फिर्यादीच्या वडीलास मागुन जोरदार धडक दिली व ते रोडच्या मध्ये असलेल्या डिव्हायडरवर पडल्याने त्याचे डोक्याचे मागिल बाजुस मार लागुन जबर दुखापत झाल्याने जागीच मरण पावले.**आरोपी आकाश सुभाष यादव, वय २५ वर्ष, रा. डब्लुसिएल उमरेड याला दारूच्या नशेत वाहन चालविल्याने अपघात होवुन मृत्यु होवु शकतो हे माहीती असतांना सुद्धा त्याने त्याच्या ताब्यातील वाहन दारूच्या नशेत भरधाव वेगाने, निष्काळजीपणाने चालविल्याने सदर अपघात होवुन फिर्यादीच्या वडीलाचा मृत्यु झाला.**

सदर प्रकरणी पोलीस स्टेशन उमरेड येथे आरोपी वाहन चालकाविरूद्ध कलम १०५ भान्यासं (सदोष मनुष्यवध) सहकलम १८४, १८५ मोटर वाहन कायदा अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

# पोलीस स्टेशन कळमेश्वर हद्दीतील मौजा गोंडखैरी पारधी बेडा येथे अवैधरित्या मोहाफुल गावठी हातभट्टीची दारू निर्मिती आणि विक्री करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हे नोंद, ६९ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त कळमेश्वर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कळमेश्वर :–** दिनांक ३०/०६/२०२६ रोजी कळमेश्वर पोलीस स्टेशन हद्दीतील मौजा गोंडखैरी पारधी बेडा येथे मोहाफुल गावठी दारू गाळणारे व विक्री करणाऱ्यांविरोधात विशेष मोहीम राबविण्यात आली. मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री. सागर खर्डे उपविभागिय पोलीस अधिकारी सावनेर उपविभाग यांच्या मार्गदर्शनात कळमेश्वर पोलीसांनी मौजा गोंडखैरी पारधी बेडा येथे **०४ महिला आरोपी यांचेवर कारवाई करत रनिंग भट्टया नष्ट केल्या. नमुद आरोपींवर ४ गुन्हे नोंद करण्यात आले.**

**पोलीसांनी घटनास्थळावरून पंचासमक्ष एकुण २५३ लिटर मोहाफुल गावठी दारू तसेच ११०० लिटर मोहाफुल रसायन सडवा आणि इतर मुद्देमाल असा एकुण ६९,०००/– रूपयांचा माल जप्त केला. नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. नमुद महिला आरोपीतांविरुद्ध कळमेश्वर पोलीस ठाणेस महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये एकुण ०४ गुन्हे नोंदविण्यात आले आहे.**

# अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ०३ आरोपीतांविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हा नोंद

दिनांक ३०/०६/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयात अंमली पदार्थाचे सेवन करणारे आरोपीतांवर खालील प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

**पोलीस स्टेशन कोंढाळी** अंतर्गत आरोपी अजगर खॉ युसुफ खॉ पठान, वय ६२ वर्ष, रा. शनिचरापेठ कोंढाळी हा मौजा शनिचरा कोंढाळी येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन खापा** अंतर्गत आरोपी साजन सुरजगिर बेंपे, वय २० वर्ष, रा. चारगाव हा मौजा चारगाव येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन कळमेश्वर** अंतर्गत आरोपी ओमकार सुरेश पवार, वय ३९ वर्ष, रा. वार्ड क्र ५, सावता मंदीर जवळ कळमेश्वर हा मौजा रेल्वे स्टेशन समोर सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला.

# अवैधरित्या धारदार शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद नरखेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन नरखेड** :— दिनांक ३०/०६/२०२६ रोजी नरखेड पोलीसांना गोपनिय माहीती मिळाली की, पोस्टे नरखेड हद्दीतील डोरली भांडवलकर येथील सिद्धार्थ कुकडे याच्याजवळ धारदार तलवार आहे. नमुद माहीती प्राप्त होताच पोलीसांनी तात्काळ घटनास्थळ गाठले असता आरोपी सिदधार्थ रामदास कुकडे, वय ४१ वर्ष, रा. डोरली भांडवलकर, ता. नरखेड याचे घराची पंचासमक्ष घरझडती घेतली असता त्याचे ताब्यातून **एक धारदार लोखंडी तलवार** मिळुन आली.

**पोलीसांनी पंचासमक्ष एक धारदार लोखंडी तलवार जप्त केली आहे. नमुद प्रकरणी आरोपींविरूध्द पोस्टे नरखेड येथे कलम ४/२५ शस्त्र अधिनियम, सहकलम १३५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ अन्वये गुन्हा नोंद आहे.**

# नागपूर ग्रामीण जिल्हयात अवैध जुगार चालवणाऱ्यावर ०६ गुन्हे नोंद.

दिनांक ३०/०६/२०२६ रोजी महाराष्ट्र जुगार कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशन यांनी अवैधरित्या ५२ ताशपत्ते खेळणाऱ्या तसेच सट्टापट्टी जुगार खेळणाऱ्या/खेळविणाऱ्या आरोपीतांवर छापा टाकुन ५२ ताशपत्ते, सट्टापट्टी साहित्य व रोख रक्कम असा एकुण २१४३/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये एकुण ०६ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. ते खालीलप्रमाणे.

**पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे आरोपी नामे जितेंद्र किसनाजी सिरसाठ, वय ३० वर्ष, रा. पेठमूकातपूर हा अवैधरित्या सट्टापट्टीचा जुगार चालवितांना मिळुन आल्याने त्याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी नामे अमीत गालाजी ठोसर, वय २९ वर्ष, रा. शनी चौक, मातगंपुरा काटोल हा अवैधरित्या सट्टापट्टीचा जुगार चालवितांना मिळुन त्याचेवर ०१ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन मौदा** येथे आरोपी नामे १) रूपेश रमेश पंचवटे, वय ३८ वर्ष, २) राजेंन्द्र मुन्नाजी हाडगे, वय २७ वर्ष, दोन्ही रा. गरदेव चौक, मौदा तसेच आरोपी १) उमेश गजानन कांबडे, वय ३६ वर्ष, २) देवानंद मधुकर सहारे, वय ३९ वर्ष, दोन्ही रा. माथनी हे ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना मिळुन आल्याने त्यांचेवर ०२ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन वेलतूर** येथे आरोपी नामे दादा सोमा आडीकने, वय ६२ वर्ष, रा. हरदोली राजा, ता. कुही, जि. नागपुर हा अवैधरित्या सट्टापट्टीचा जुगार चालवितांना मिळुन आल्याने त्याचेवर ०१ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन कळमेश्वर** येथे आरोपी नामे मंगेश शंकर इवनाते, वय ३४ वर्ष, रा. वार्ड क्र १५, कळमेश्वर हा अवैधरित्या सट्टापट्टीचा जुगार चालवितांना मिळुन आल्याने त्याचेवर ०१ गुन्हा नोंद आहे.

# अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध २० गुन्हे नोंद

दिनांक ३०/०६/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन मोहाफुल दारू, मोहाफुल सडवा, देशी दारू, इतर साहित्य व वाहन असा एकुण १,२९,७०५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण २० गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन भिवापूर** येथे १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कुही** येथे २ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन वेलतूर** येथे १ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन केळवद** येथे ३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन खापा** येथे ३ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन मोहपा** येथे १ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन कळमेश्वर** येथे ७ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन मौदा** येथे २ गुन्हे नोंद.

**नमुद कारवाईत एकुण ९७२० मिली देशी दारू, ३६० लिटर मोहाफुल दारू, १५०० लिटर मोहाफुल सडवा, इतर साहित्य व वाहन असा एकुण १,२९,७०५/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने